# प्रकरण चवथे

# “गणगोत” मधील व्यक्तिचित्रणाचे विशेष

## – प्रकरण चवथे –

## – 'गणगोत' मधील व्यक्तिचित्रणाचे विशेष –

---

'गणगोत' या पु.लं.च्या दुसऱ्या व्यक्तिचित्रणपर ग्रंथाचा विचार करताना हेच सत्य अधिक प्रकर्षानं जाणवू लागते. या ग्रंथात एकंदर सोळा व्यक्तिरेखा समाविष्ट झाल्या आहेत. 'व्यक्ति आणि वल्ली' यातली माणसे काल्पनिक नसली तरी त्यांची नाव गाव पु.लं.नी बदलून टाकली होती. थोडेफार कल्पनेचे रंगही व्यक्तिचित्रण करताना त्यांनी वापरले होते. पण 'गणगोत'मध्ये तसा प्रकार नाही. या ग्रंथातील एकूण एक व्यक्तिरेखा संपूर्णपणे वास्तवाच्या रंगांनी रंगविली आहेत.

**आयुष्यात भेटलेली माणसे हीच गणगोत :–**

पु.लं.च्या आयुष्याच्या या प्रवासात कितीतरी माणसे भेटली. नात्याची, बिननात्याची, कुणी पोटापाण्याच्या व्यवसायात भेटली, कुणी मैफिलीत भेटली, कुणाकुणाच्या बैठकीत सामीला होण्याचे योग आले, कुणी प्रवासात भेटले, कुणी शेजारी म्हणून लाभले, कुणी आळीतले आळीकर, कुणी गावातले गावकर, कुणी जवळ आले कुणी जवळ खेचून घेतले. काहींचे आकर्षण वाढले. काहींचे अचानक कमीही झाले. काहींनी कधीही न फेडता येणाऱ्या ऋणाचा भार अलगद खांद्यावर ठेवला. प्रत्येकाला हे असे कधी जवळीक तर कधी दुरावा अशा हेलकाव्यात तरंगणारे गणगोत लाभतच असते. माणूस कधीही एकटा नसतो. त्याने तसे असूही नये. पु.ल. म्हणतात की, माझे 'गणगोत' फार मोठे आहे. अनिलांनी म्हटल्याप्रमाणे 'इथे सखे नि सोबती,कुणी इथे कुणी तिथे'.

आपुलकीच्या डोळयांनी पाहताना पु.ल. यांना जे दर्शन घडले त्याची ही चित्रे आहेत. त्यांचा आणि पु.ल. यांचा जो सहवास घडला त्या सहवासाचीच ही चित्रे आहेत.

या व्यक्तिरेखांतहि 'व्यक्ति आणि वल्ली'तल्या खूप विविधता आहे. वैचित्र्य आहे.

संगीतावर प्रेम करणारे नाटयकलेचे उपासक, इतिहासाचे वेड घेऊन जन्माला आलेले तत्वज्ञ, साहित्यिक यांच्याप्रमाणे काही सामान्य व्यक्तींची शब्दचित्रंही पु.लं.नी रेखाटली आहेत. पुस्तक प्रकाशक, गिरणीतला कारकून, पुस्तक विक्रेता, थिएटरचा मालक, रंगपटाची व्यवस्था पाहणारा... या व्यक्तीच्या ठिकाणी असा कोणता असामान्य गुण असणार आहे? पण पु.लं.च्या प्रतिभेला त्यांच्यातलं असामान्यत्वहि दिसल्यावाचून राहिलं नाही. सामान्यांतलं आगळेपण हुडकून काढता येणे हेच तर जातिवंत प्रतिभेचे नियत कार्य!

"जे न देखे रवि ते देखे कवी"

कविमंडळी धोंडयामधून ही पलीकडचं पाहू शकतो म्हणूनच तर कांचेमधून पाहू शकणाऱ्या इतरेजनांहून त्यांची जातकुळी वेगळी मानायची! सामान्य जनांना ज्यांच्या स्मृतीखातर एखादा चिरा आणून बसवण्याइतकीही गरज भासत नाही. तिथे बोरकरांसारख्या दिव्य प्रतिभेच्या कवीला त्यांच्यातल्या असामान्यतेचा साक्षात्कार होऊन तिच्यापुढे कर जुळवावेसे वाटतात.

अभिजात प्रतिभेचं देणं लाभलेल्या पु.लं.ना फणसळकर मास्तरांसारख्या गिरणी कारकुनाच्या अंगचा लोकोत्तर गुण दिसावा, रावसाहेबांसारख्या तोंडानं फटकळ, धनिक गृहस्थाची रसिकता उमगून यावी, सिनेमा स्टुडिओतलं 'प्रॉपर्टी' खात सांभाळणाऱ्या चोभे सारख्या कष्टाळू माणसाच्या निरलसपणाबरोबर मनाचा उमदेपणाहि जाणवावा – फार काय चार भिंतीपलीकडचं फारसं जग ठाऊक नसलेल्या आपल्या आजीच्या स्वभावांतले विनोदाचे सूक्ष्म कणही वेचता यात कोणतंच नवल नाही. असामान्य व्यक्तींच्या शब्दचित्रांइतकीच ही सामान्यांची चित्रण ही हृदयात उतरली आहेत यात शंका नाही.

व्यक्तिविषयी पु.लं.ना वाटत असलेल्या कमालीच्या जिव्हाळयामुळं ह्या शब्दचित्रांना सौंदर्य तर आलं आहेच शिवाय काव्यात्मता, चिंतनशीलता, सूक्ष्म निरीक्षण, भावनोत्कटता इत्यादि गुणांचा फार मोठया प्रमाणात आढळ होत असल्यामुळे त्यांची आकर्षकता शतगुणित झाली आहे हे कुणी मान्य करील.

**विविध व्यक्तिचित्रणातील रंगछटा :--**

प्रस्तुत ग्रंथात विविध व्यक्तिंच्या स्वभावरेखा चित्रित करताना पु.लं.नी. ज्या रंगछटा वापरल्या आहेत त्याचे नाजुक सौंदर्य वर्णन करून सांगणे खरोखरच लेखन सामर्थ्याच्या पलीकडची गोष्ट आहे! हा विनय नव्हे वस्तुस्थिती आहे.

'गणगोत' मध्ये समजावून देण्यासारखा, विवरण करण्यासारखा, कठीण असा कोणताच भाग नाही. जो आहे तो अत्यंत नाजूक, अत्यंत कोमल, सुंदर असा आहे. म्हणूनच ते सौंदर्य, त्याचे मार्दव, त्याचे माधुर्य उलगडून सांगण्याची कामगिरी अतिशय अवघड वाटत आहे. रेशमी धाग्यांनी विणलेल्या गोफाची कलात्मकता त्या धाग्यांना कुठंही धक्का न लावता उकलून दाखविणे कठीणच नाही का? पाऱ्याच्या घटक द्रव्याचे पृथ्थःकरण करून शास्त्रीय दृष्टीकोणांतून त्याचे स्वरूप वर्णन करून सांगता येईल. पण दवबिंदूच्या तरल, निरागस सौंदर्याची कल्पना आणून द्यायला कोणती परिभाषा वापरायची?

'गणगोत' हा संग्रह 1966 मध्ये प्रकाशित झाला. या संग्रहातील व्यक्ती वास्तव आहेत. लेखकाच्या जीवनातील व्यक्तीची रुहवास चित्र 'गणगोत' मध्ये आल्याचे प्रस्तावनेत म्हटले आहे.

आदर, श्रद्धा, कौतुक, मैत्री अशा विविध दृष्टीकोणातून ही निखळ व्यक्तिचित्रे लिहिली असून लेखकाने या व्यक्ती पूर्णपणे वास्तव स्वरूपात रंगविण्याचा बराचसा यशस्वी प्रयत्न केला आहे. ही व्यक्तिचित्रे रंगविताना बऱ्याचवेळा वर्ण्य व्यक्तीचा पोषाख रंगरूप वर्णन करून त्यांना खास सवयी लकबीची जोड दिली आहे. निरनिराळया वेचक प्रसंगातून अंतरंग दर्शन घडविताना व्यक्तीनुरूप खास शैलीची जोड दिल्यामुळे ही चित्रे जिवंत झाली आहेत. अधून मधुन होणारा विनोदाचा शिडकावा लेखनात अधिकच प्रसन्नता आणतो.

गणगोत मधील सोळा व्यक्तिचित्रांचे विशेष याचा विचार पढील प्रमाणे केला आहे.

'ऋग्वेदी' ह्या पहिल्याच व्यक्तिचित्रांत आपल्या आजोबांचा – मंगेश वामन दुभाषी ह्यांचा परिचय करून देताना पु.लं.नी सुमारे चाळीस--पंचेचाळीस वर्षापूर्वीच्या समाजस्थितीचे ओझरते दर्शन घडविले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात हिमालयासारखे भव्योदत्त आदर्श डोळयासमोर ठेवून चालणारी माणसे पुढे महायुद्धाचा वरवंटा फिरल्यानंतर कशी भुईसपाट होऊन गेली. बिगरकणा स्वार्थी,

माणसांच्या गर्दीत त्याचे हिमालयाचे आदर्श कसे साफ वितळून गेले याचे मोठे विदारक चित्र या लेखा पु.लं.नी रेखाटले आहे. महायुद्धाच्या महागाईचा दणका बसल्यामुळे सगळी माणसे कशी खचून गेली, हीन, दुबळी होऊन गेली हे सांगताना पु.ल. लिहितात -- (1)

"आयुष्यभर उराशी जतन करून ठेवलेल्या मूल्यांची धूळदाण झालेली पाहात माझ्या आजोबांनी आणि त्यांच्या पिढीतल्या आदर्शवादी भाबडया लोकांनी नव्या परिस्थितीचे धसके घेत घेत देह ठेवला."

यःकश्चित् कारकुनी पेशात सारी हयात घालवून साहित्य सेवेचे महान ध्येय ऊराशी बाळगणाऱ्या, आर्थिक ओढघस्तीने पाठपुरावा केलेला असूनही ग्रंथाध्ययनाचे व्रत अखंड चालू ठेवणाऱ्या आणि कोणत्याही सामाजिक सुधारणेला अत्यंत प्रतिकूल काळ असूनही आगरकरांच्या सुधारणांचा उच्चारांतून नि आचारांतून पुरस्कार करणाऱ्या ऋग्वेदीसारख्या ऋषितुल्य माणसाची व्यक्तिरेखा रेखाटून पु.लं.नी पितृऋणातून अंशतः उतराई होण्याचा कृतज्ञताबुद्धीने प्रयत्न केला. तसा पुढील पिढयांना प्रेरक वाटेल असा महान आदर्श त्यांच्यापुढे ठेवून त्यांना ऋणी करून ठेवले यात शंका नाही.

ऋग्वेद विषयीच्या अनेक छोटया मोठया आठवणीतून पु.लं.नी त्यांची व्यक्तिरेखा साकार केली आहे. मराठी, कानडी, कारवारी, संस्कृत, बंगाली, हिंदी आणि गुजराथी इतक्या भाषांचा परिश्रमपूर्वक अभ्यास करण्याइतकी पु.लं.च्या आजोबांच्या ठिकाणी ज्ञानलालसा होती. त्यांच्या चिकाटीचे कौतुक करावे की या व्यासंगाच्या जोडीला आयुर्वेद, होमिओपाथी, बायोकेमिस्ट्री यांच्या अभ्यासासारखे नानाविध खटाटोप पाठीमागे लावून घेणाऱ्या त्यांच्या कार्य व्यापृत्वाचे नवल करावे हे समजेनासे होते. रात्री शाळा, किराणा भुसार मालाचे दुकान, अनेक कार्यकारी मंडळांशी संबंध, इंग्लिश कंपनीत आणि त्यानंतर कापसाची खरेदी विक्री करणाऱ्या जपानी कंपनीत नोकरी, कीर्तन, हौसिंग को. ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना असे अनेक व्याप चालू ठेवूनही ग्रंथवाचनाचा ग्रंथनिर्मितीचा छंद एखाद्या व्रताप्रमाणे त्यांनी निष्ठेने शेवटपर्यंत टिकवून धरला या गोष्टीचे विशेष आश्चर्य वाटू लागत. आश्चर्याबरोबर आदरही. 'सणाचा इतिहास' हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी त्यांनी पूर्वतयारी म्हणून जो अभ्यास केला तो पाहिला म्हणजे छाती अक्षरशः दडपून जाते। वेद, ब्राह्मणांचे, पुराणेतिहास, गृह्यसूत्रे, काव्य, स्मृतिशास्त्र, यवन प्रवाशांचे लेख, नाणी, शिलालेख ह्या सर्वांचा सूक्ष्म अभ्यास

केल्यानंतर ऋग्वेदींनी आपला ग्रंथ लिहिला.

आजोबांच्या जीवनातल्या अशा काही महान गोष्टींचा निर्देश केल्यावर पु.लं.नी काही बारीक सारीक गोष्टींचा उल्लेख करून या व्यक्तिचित्रणाची खुमारी वाढविली आहे. आपल्या आजोबांचा संगीताशी कसा मतभेद होता आपल्या कलेचे चीज म्हणून त्यांनी आपणाला त्रिफळाचूर्णाची बाटली देऊन 'जाग्रण करतोस नियमित हे घेत जा' म्हणून कसा उपदेश केला, त्यांनी तरूणपणी लिहिलेले 'समाजोन्नती' हे नाटक मराठी रंगभूमीच्या सुदैवाने कोणी बसवण्याचे धाष्टर्य कसे केले नाही वगैरे चिल्लर उल्लेखामुळे व्यक्तिचित्राची शोभा वाढली आहे.

'अनेक संस्थांच्या कार्यकारी मंडळात असूनही ते कार्य करण्याचा बावळटपणा करीत', 'चित्रकलेची आवड असल्यामुळे तिरंगी मुखपृष्ठे ही त्यांना फारशी आवडत नसत' अशासारख्या विरोधाभासात्मक वाक्यामुळेही लेखाला चुरचुरीतपणा आला आहे.

काळसर छाया मिसळलेल्या संधीप्रकाशा सारखा प्रस्तुत लेखाचा करूण, उदास शेवट मनाचा तळ ढवळून काढतो. पु.ल. म्हणतात -- (2)

"होती नव्हती तेवढी सारी कमाई घर बांधण्यात आणि पुस्तके छापण्यात घालविली. त्या घरातल्या छोटयाशा दिवाणखान्यात आजोबा आजींचा वानप्रस्थाश्रम होता. आजीची प्रकृति ढासळली आणि एकमेकांची सेवा करीत हे वृद्ध जोडपे भरल्या घरात एकाकी असे राहू लागले. ज्या अकिंचनावस्थेत ते मुंबईला आले तीच अवस्था राहते घर तेवढे सोडल्यास पुन्हा प्राप्त झाली. पण आता गात्रे थकली होती. आयुष्यात सोबतीने खस्ता काढणारी जोडीदारीण अंथरूणाला खिळली होती. आपल्या संसारातल्या सुखदु:खांच्या कथा नातवंडांना सांगणे हा एकच उद्योग अण्णांना राहिला होता. आपली आता कोणालाही गरज नाही हा निराशापूर्ण विचार त्यांच्या मनाला डागण्या देत होता. त्याच सुमारास आजी वारली आणि अण्णा एकटे झाले. त्यापूर्वी माझे वडील वारले. एकुलत्या एका मुलीवर आलेल्या संकटाने ते खचले. त्यांच्या आनंदी, उत्साही वृत्तीत एकदम फरक पडला. दिवाणखान्याच्या खिडकीत शांतपणे दूरवर नजर लावून बसणे हा आवडता कार्यक्रम झाला. जीवनात शून्यता निर्माण झाली...."

'फणसळकर मास्तर' असेच ध्येय प्रवण तेजस्वी व्यक्तीचे दुसरे चित्रण या ग्रंथात पु.लं.

नी केले आहे. ऋग्वेदी प्रमाणेच फणसळकर मास्तरांनीही उभी हयात कारकुनीत घालविली. कारकुनी पेशात आयुष्य पिचत असतानाच त्यांच्या दृष्टीसमोर देशाच्या उत्थापनाची स्वप्ने तरळत होती. गावातल्या मुलामुलींवर सुसंस्कार करायचे, त्यांना हाताशी धरून नवे नवे उपक्रम आखायचे, इतिहासातल्या, पुराणातल्या कथा त्यांना सांगून आपल्या देशाबद्दल, धर्माबद्दल नि संस्कृतीबद्दल त्यांच्या मनात पूज्यभाव निर्माण करायचा हा त्यांचा नित्याचा छंद। ह्या छंदापुढे त्यांना आपल्या गरीबीची पर्वा वाटली नाही. या छंदातून आपणाला देशाला एखादा टिळक एखादा सुभाष, एखादा भगतसिंह देता येईल अशी भाबडी आशा त्यांना वाटत होती. समर्थ रामदास, शिवाजी आणि लोकमान्य या त्रिमुर्तीच्या उपासनेत नि ध्यानधारणेत मास्तरांचा जीव रमत असे. रोज सकाळी या त्रिमुर्तीच्या तसबीरीपुढे हात जोडून अनन्यभावाने 'तव स्मरण सतत स्फुरणदायी आम्हा घडो' म्हटले की खरोखरच स्फुरण येत असा त्याचा दृढ विश्वास होता. आणि मग पार्ल्यातल्या मुलांनाही हे स्फुरण यावे, यांनाही हा अलौकिक साक्षात्कार व्हावा या कळकळीने ते त्यांना टिळक मंदिरात जमा करीत नि त्या लोकविलक्षण ग्रामदेवतेपुढे नतमस्तक व्हायला लावीत. पु.लं.नी त्या वेळच्या त्या प्रसंगाचे अत्यंत हृद्य शब्दात वर्णन केले आहे.(3)

"कारकुनी पेशातली लहान लहान माणसे आम्ही. आम्हांला स्फुरण येऊन येऊन येणार किती? पण येत होते हे खरे. कुठे लोकमान्य आणि कुठे आमच्यासारखी चिल्लीपिल्ली। पण आम्हांला खरोखरीच वाटे की दंड–बैठका काढल्या की शिवाजी महाराजांना ते आवडते. वाणी शुद्ध झाली की समर्थ खुश होतात आणि आपल्या कृतीवर लोकमान्यांची दृष्टी आहे..."

सिनेमा नटयांच्या चिंतनात मश्गुल झालेल्या अन् त्यांच्या हावभावांचा आदर्श समोर ठेवणाऱ्या आजच्या बेछूट पिढीचे चित्र वरील चित्राशेजारी मांडून पाहिले की दोहोतली जमीन–अस्मानाची तफावत ध्यानात येऊन जीव गलबलल्यासारखा होतो।

मास्तरांच्या नेतृत्वाखाली लक्ष लक्ष नमस्कारांचे संकल्प सोडण्याची जिद्द बाळगणाऱ्या त्या वेळच्या तरूण पिढीचा ध्येयवाद पाहिला म्हणजे आजच्या ध्येयशून्य, निष्क्रिय तरूण तरूणींच्या अळणी जीवनक्रमाबद्दल चिंता वाटू लागते.

"पुरूषोत्तम पार्ल्यात आपण काय केलं असताना आपल्या गावातून देशाला एखादा

लोकमान्य देता येईल रे?" असे फणसळकर मास्तर तळमळीने विचारीत तेव्हा पु.ल. मिष्किलपणाने हसत, "मास्तर, लोकमान्य तयार करायचे म्हणजे पार्ल्याच्या फॅक्टरीत बिस्कीटाचा पुडा करण्याइतके का ते सोप आहे?"

त्यावेळी मास्तरांना आपल्या ध्येयाचा पल्ला केवढा मोठा आहे हे उमगून येई. पण ते निराश होत नसत. स्वतःची अपूर्ण राहिलेली सारी स्वप्ने आजुबाजूच्या मुलांमधून त्यांनी पुरी करून घ्यायची होती. त्यावेळच्या महत्वाकांक्षी साध्या भोळया पिढीचे मास्तरांच्या रूपाने प्रातिनिधिक चित्रच पु.लं.नी रंगविले आहे असं हा लेख वाचीत असताना राहून राहून वाटत असते.

देश जसजसा सामाजिक नि राजकिय स्थित्यंतरांतून जाऊ लागला तसतसे मास्तरांचे विचार तरूणांना जुने वाटू लागले. महात्माजींच्या राजकारणाचा प्रभाव सर्वत्र पडू लागला. टिळकांच्या नावाचा उच्चार फक्त टिळक पुण्यतिथीच्या निमित्तानेच करण्याची लोकांना गरज वाटू लागली. ह्या दुर्धर, विपरीत परिस्थितीबद्दल लिहिताना पु.लं.नी व्यक्त केलेले विचार मननीय वाटल्यावाचून राहणार नाहीत. ते म्हणतात – (4)

".... पण गांधींच्या अनुयायांनी टिळकांविषयी काढलेले गहिंवर मला तरी खोटे वाटत! ह्यांच्या आत आत कुठे टिळक नाहीत असे वाटे! मास्तरांचा उमाळा खरा वाटे, शिवाजी महाराजांचे नाव तर त्याकाळी बरबादच करायचा घाट होता. परवा परवापर्यंत होता. संयुक्त महाराष्ट्रानंतर छत्रपतींची आठवण झाली आणि 'शस्त्राघाता शस्त्रचि उत्तर' हे चिन्यांनी शिकविले! आता छत्रपतींना स्वतःच्या प्रसिद्धीसाठी राबवण्याचे कार्य चालू झाले बिचारे शिवबा!..."

मास्तरांच्या ध्येयवादाचा आलेख चित्रित करताना प्रतिपादनाच्या ओघात पु.लं.नी मतलबी पुढाऱ्यांच्या दिखाऊ देशभक्तीवर टाकलेला हा प्रकाश म्हणजे 'क्ष' किरणांचाच प्रकाश म्हटला पाहिजे. पांढऱ्याशुभ्र पोशाखा खाली दडलेल्या चामडीचाही पारभेद करून आत आत लपलेले दंभ या किरणांनी स्पष्टपणे निदर्शनास आणून दिले आहे. आदर्शवादापासून, चारित्र्यापासून दूर दूर जात चाललेल्या तरूण पिढीकडे पाहताना मास्तरांच्या मनाला जे दुःख होई, ज्या वेदना होत त्याचे अत्यंत हळुवारपणे पु.लं.नी वर्णन केले आहे.

आधुनिक वाङ्मय मास्तर वाचीत पण त्यात कुठे गरूडाची झेप त्यांना आढळून येत

नसे. अस्वस्थ करून टाकणारे असे त्यात काहीही नसल्याची त्यांना जाणीव होई तेव्हा ते पु.लं.ना म्हणत "...तू देखील नुसतंच चावट लिहितोस! अरे 'सन्यस्त खड्‌ग' सारखे बंद तोडणारे नाटक लिही. मी तुझे वाचून हसतो. माणसे फार निरखून पाहतोस. पण दृष्टी गरूडाची हवी! तात्याराव बघ शतजन्म शोधताना आर्ति व्यर्थ झाल्या हणाले."

दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वांचीच जीवनं उध्वस्त झालेली मास्तर पाहात होते. तरीही एखाद्या गरूडाचा फूत्कार कानी येईल अशी ते आशा बाळगून होते. मास्तरांच्या या दुरन्त आशावादा बद्‌दल लिहिताना पु.ल. म्हणतात –

"असल्या काळात बुभुक्षित गिधाडांनाच गरूड म्हणतात नव्हे सक्तीने म्हणावे लागते हे त्यांना काय सांगावे? त्यांना पाल्यात भगतसिंग निघायला हवा होता. त्यांच्या स्नानसंध्येला उदंड पाणी हवे होते ते निराळेच.... इंग्रजांचा क्षय झाला तरी आनंदवन भुवनाची निर्मिती होत नव्हती. मास्तरांची खंतच निराळी होती. त्यांचा ध्यास वेगळा होता..."

जगाच्या कल्याणासाठी तळमळणारी तिसरी पिढी या ग्रंथात आपल्या दृष्टीस पडते ती "विनोबा भाव्यांची" वाचकांना सर्वात उदात्त वातावरणात घेऊन जाणारा असा हा लेख आहे. भूदानाच्या निमित्ताने विनोबांनी बिहारमध्ये जी पदयात्रा काढली होती, तिथल्या जमीन्दारांपुढे अन् भूमिहिनांपुढे जी प्रवचने दिली होती त्याची ही एक लहानशी सुंदर झलक आहे! विनोबांची दिनचर्या थोरांपासून पोरांपर्यंत सर्वांशी समरस होऊन वागण्याची त्यांची वृत्ति, त्यांची व्यासंगशीलता या साऱ्याचे मनोज्ञ दर्शन प्रस्तुत लेखात पु.लं.नी घडविले आहे. ते घडविताना त्यांच्या प्रतिभेला जे विलक्षण स्फुरण चढते त्यांच्या चिंतनशील प्रकृतीचा जो मनोहर आविष्कार पाहावयास मिळतो तो मोठा सुखावह वाटतो. रसिकराज रामूभय्या दाते, हिराबाई बडोदेकर किंवा चिंतामणराव कोल्हटकर यांच्या व्यक्तित्वाचा अत्यंत खेळकर, रसील्या वृत्तीने परिचय करून देणारे पु.ल. आणि भूदान मागायला निघालेल्या या आधुनिक सर्वोदयी द्रष्टया महर्षींचे तितक्याच उच्च स्तरावरून दर्शन घडविणारे पु.ल. एकच आहेत किंवा काय असा सुखद संभ्रम व्हावा इतका या लेखाच्या भाषेचा ढंग वेगळा आहे. पाणवठयाकडे जायला निघालेल्या राधेची वाट अडवणाऱ्या अवखळ श्रीकृष्णाला अर्जुनासारख्या भ्रांतचित्त शिष्योत्तमाला मार्गदर्शन करण्याइतके गांभीर्यही अंगी आणता येते. गोपींची वस्त्र कदंब

वृक्षावर ठेवून त्यांना लज्जित करणारी त्याची उच्छृंखलता द्रौपदीला वस्त्र पुरवून तिची लाज झाकण्या इतकी उदात्तही बनू शकते हेच खरे! अभिजात प्रतिभावंताच्या भाषाशैलीला प्रसंगपरत्वे वेगवेगळी रूपे धारण न करता आली तर नवल!

पू. विनोबाजी बाबा बोलतांत कसे, चालतात कसे, दिसतात कसे, अडाण्यांना अन् अडाणीपणाचे सोंग घेतलेल्यांना समजुतीच्या गोष्टी सांगून त्यांचा भ्रमनिरास करतात कसे, रात्रीच्या नीरव, प्रशांत वेळी सारे जग निद्राधीन झाले असताना हा संयमी मुनिसत्तम त्यावेळी उपनिषदाच्या अध्ययनांत नि चिंतनात कसा गढून गेलेला असतो, बाबांच्या सर्वोदयी तत्वज्ञानाच्या अथवा भूदानाच्या कार्यक्रमाचा अभ्यास करण्यासाठी देशोदेशीची नि प्रांतोप्रांतीची जिज्ञासू मंडळी शिष्यत्वाची भूमिका स्वीकारून त्यांच्याकडे करो आकृष्ट झालेले असतात ह्या साऱ्यांचा सुंदर लघुपटच जणू आपल्या दृष्टीपुढून सरकू लागतो.

मध्यरात्र उलटून गेली तरी बाबांची ज्ञानसाधना कशी अखंड चालू आहे याची कल्पना आणून देणारा पु.लं.च्या वर्णन शैलीचा हा नमुना पाहा –(6)

''सारी मंडळी झोपेत आहेत. गात्रे थकली आहेत परंतु उत्साह थकला नाही. त्यांच्या उत्साहाचा झरा पलीकडच्या खोलीत जागता आहे... सर्व भूतांची ही निशा आहे. हा कृश संयमी आपले आवडते ईशावास्योपनिषद घेऊन समाधि लावून बसला आहे. मधूनच एखादी उक्ति जोरात बाहेर पडते. पेन्सिलने कुठल्यातरी ओळीवर खूण होते. पुन्हा चिंतन, पुन्हा वाचन, पुन्हा समाधि. समोरच्या कंदिलाच्या मंद प्रकाशात त्या कृश तापसाची तेजोमय मूर्ती गाभाऱ्यातल्या शिवमूर्तीसारखी निश्चल आहे....

''घण् घण् घण् घण् घण्... तीन वाजले समाधि स्थिर आहे. प्रचंड गतिमान चक्रासारखे हे स्थैर्य आहे. जगाचे तीन वाजले. विनोबा कालौघाच्या खूप खाली गेले आहेत. कालपरमाणूचा तपोबलाने स्फोट करून विनोबा खूप आत खूप खोल जाऊन स्थिर झाले आहेत. किंवा उपनिषद्कालात खोल डुबकी मारून तिथे त्यांनी समाधी लावली आहे. कालगंगा वरून वाहते आहे. हा महामुनी आत आत जागतो आहे. उपनिषद्कारांशी 'लडिवाळे' करतो आहे मनूला प्रश्न करतो आहे. शंकराचार्यांच्या प्रखर बुद्धीमत्तेच्या तेजःशलाकांची आपल्या डोळयात साठवण करतो

आहे. ही समाधि ढळत नाही. साक्षात व्याघ्र समोर आला परंतु भगवान पाणिनीची समाधि ढळली नाही. तो शब्द ब्रह्म स्वरूप झालेला महामनस्क, व्याघ्र पाहून 'व्या जिघ्रतीति व्याघ्रः' ही व्युत्पत्ती सापडल्याच्या आनंदात व्याघ्ररूपी कालोदरात गडपही झाली... त्याच पाणिनीच्या वंशातील हे बालक आहे..."

पदयात्रा चालू असताना सभोवार सौंदर्याची उधळण करणाऱ्या निसर्गाच्या औदार्याचे विनोबाजी मनातल्या मनात कौतुक करीत आहेत, तर त्याच वेळी जमीनदारांच्या कृपण स्वभावामुळे त्यांच्या मनाला वेदनाही होत आहे. निसर्गाची निरागसता आणि समाजातील विषमता यांच्या दर्शनाने त्यांच्या मनात उठणाऱ्या संमिश्र विचार कल्लोळाचे पु.ल. असे वर्णन करतात –(7)

"यात्रा चालली आहे. शोण नदीच्या कालव्यांतील पाणी आकंठ प्यालेली जमीन क्षितीजापर्यंत हिरवीगार दिसत आहे. कवी मनाला तो हिरवागार गालिचा वाटतो. त्यांना कधी ती शेते मंद समीरणाबरोबर डोलडोलताना दिसत असतात. त्या हरिततृणांच्या पात्या पात्यांतून सळसळीचे संगीतही ऐकू येत असते. विनोबांना ती सळसळ भूमिहीनांच्या निराश निःश्वासांसारखी वाटते! अस्मानाच्या निळया चादरीचे पांघरूण सगळयांना मिळते. मग ही हिरवी बिछायत पसरण्याचे काम मात्र शेतकऱ्यांनी करावे आणि तीवर मनमुराद लोळावे. मात्र काही थोडया जमीनदारांनी ही विषमता का? हा प्रश्न त्या योग्याच्या समाधिसुखाचा भंग करतो! पंचमहाभूतांतील आप--तेज–वायू आणि आकाशाला मालकी नाही तर पृथ्वीचीच मालकी काही मूठभर लोकांच्या हाती का? मृण्मयांतून पुन्हा मृण्मयच होणारे जर साऱ्यांचे देह, आतील चिन्मय जर साऱ्यांचे एक, एकच तत्व साऱ्या ठिकाणी तर मग ह्या कृत्तिकेची मालकी ती कसली? विचारचक्राला प्रचंड गती मिळाली आहे; क्रांती कार्याची लहान–लहान चक्रेही जोरजोरात सुरू झाली. पावलांचा वेग वाढला..."

चिरपरिचित दृष्टांताच्या साहाय्याने विनोबा आपले विचार श्रोत्यांच्या चित्तावर कसे ठसवितात याचे चित्र पु.लं.नी असे रेखाटले आहे --

"अरे भूमिवंतांनों, तुमची जमीन आता तुमच्यापाशी शोभत नाही. तुम्ही स्वतः तिथे कसत नाही. तुम्हांला नांगर चालवता येत नाही. वाचता न येणाऱ्याच्या बगलेत पुस्तक शोभत नाहीत... तुमच्यापाशी मालकीचा नुसता साबण आहे. नुसता साबण बाळगून स्वच्छता येत नाही.

पाणी हवे! ज्यांच्या मनगटात पाणी आहे त्यांना साबण द्या -- त्याचे जीवन अधिक निर्मळ होईल. त्यांच्यापाशी असलेल्या पाण्यावर तुमचा हक्क शाबीत होईल. दोघंही उजळून निघा. तुम्ही कसणाऱ्यांना जमीन द्या! आनंदाने जमीन द्या. एकदा देण्यातली गंमत तरी पाहा. जीवनातला दानाचा आनंद लुटा! दानवंत व्हा – 'मादान' म्हणवून घेण्यात काय पुरूषार्थ आहे?..."

विनोबांच्या अमृतमधुर वाणीचे आकंठ प्राशन करण्याच्या उत्कंठेने त्यांच्याभोवती हजारो खेडुतांचा मेळावा जमला तेव्हाचे ते दृश्य वर्णन करून सांगताना पु.लं.ची कल्पना कशी पल्लवीत झाली तेही पाहण्यासारखे आहे ते म्हणतात --(9)

"विनोबांच्या मागून सारा गाव चालू लागला. शंकराच्या जटेतून बाहेर काढलेल्या गंगेप्रमाणे पवनारच्या आश्रमांतील भगीरथ प्रयत्नांतुन निर्माण झालेली ही विचारगंगा आज बिहार मधल्या शोण--फल्गु--गंगेशी स्पर्धा करीत जनसागराला कडकडून भेटण्यासाठी आली आहे."

विनोबांचा साम्यवाद प्रत्यक्षात कधी उतरणार आहे का? की त्यांचे केवळ स्वप्न आहे?' अशा प्रकारच्या शंका घेणाऱ्यांना पु.लं.नी काव्यमय शब्दांत कसे समर्पक उत्तर देऊन या लेखाचा समारोप केला आहे तो पाहा –(10)

"माणूस माणसाजवळ येण्याची प्रसादचिन्हे दिसत आहेत. लोक म्हणतात,'साम्ययोग' हे विनोबांचे स्वप्न आहे; परंतु योग्यांना जी आधी स्वप्ने पडतात तीच सत्यसृष्टीत येतात.ह्या दृष्ट्यांना असले दृष्टांत देण्याची भगवंताने एकदा चूक केली की,ते प्रत्यक्षात आणल्याखेरीज त्यालाही गति नसते! बुद्धाला असे स्वप्न पाडून 'तो' एकदा चुकला होता. समर्थांना आनंदभुवनाचे 'स्वप्न' दाखवण्याची त्याने एकदा अशीच चूक केली. महर्षि विनोबांनाही त्याने दृष्टांत दिला आहे. तो आता विनोबांचे देणे लागतो! फक्त आसुरी स्वार्थांचे प्राबल्य झालेल्या ह्या काळात खुद्द त्यालाही आपण हे स्वप्न साकार करायला मदत केली पाहिजे.... आसुरापुढे 'तो' ही कधी कधी हात टेकतो आणि म्हणूनच 'देवांच्या मदतीस चलारे' म्हणून रामाच्या मदतीला वानरांनाही जावे लागते. भगवंताच्या प्रेरणेने सुरू झालेल्या कार्याला ह्याच भावनेने एकत्र यायचे आहे. सोन्याच्या लंकेत राहणाऱ्या आधुनिक रावणांना नाहीसे करायला महर्षि विनोबांना हा एकच रामबाण उपाय वाटतो आहे तो त्यामुळे!"

केशवराव भोळे, हिराबाई, रामूभय्या दाते आणि बालगंधर्व (दया छाया घे..) त्याच्या संबंधीच्या लेखात पु.लं.ना त्या त्या कलावंताविषयी वाटणाऱ्या असीम आदराबरोबरच त्यांची संगीत विषयक अभिरूची किती डोळस किती व्युत्पन्न आहे याची आपणाला चांगली कल्पना येते. संगीताची आराधना करणाऱ्यांना किती सायास घ्यावे लागतात याची त्यांना स्वानुभवाने पूर्ण कल्पना आलेली असल्यामुळे त्यांच्या तपस्येचे त्यागाचे नि तितीक्षेचे मूल्यमापन करण्याचा त्यांचा अधिकार कोणीही नाकारू शकणार नाही.

बालगंधर्व हे तर कुलदैवताइतके संगीताच्या क्षेत्रातले त्यांचे पूज्य दैवत. त्या दैवताबद्दल लिहिताना, त्या स्वरसम्राटाच्या आठवणी सांगताना त्याच्याविषयीच्या भक्तिभावाचे गहिंवर त्यांच्या कंठात दाटले नसतील तरच नवल!

विनोबांच्या दिनचर्येचे वर्णन करताना पु.लं.च्या लेखणीने आध्यात्मिकतेची पातळी गाठली होती. बालगंधर्वांच्या अभिनय गुणाचा अन् स्वरविलासाचा गौरव करताना कलात्मतेची एक वेगळीच पातळी तिने गाठली आहे.

करूण, शृंगार, वात्सल्यादि भिन्न भिन्न रसांचा आविष्कार करणारा नारायणरावांचा बोलका अभिनय, किंवा तितक्याच उत्कटतेने स्वरांतून रस प्रतीती घडविणारा त्यांचा स्वरविलास यांचा आस्वाद घेताना पु.लं.च्या रसिकतेला असा काही बहर येतो की, वसंताच्या चाहुलीने फांदीगणिक मोहरणाऱ्या आम्रवृक्षाचीच आठवण व्हावी.

'धनी मी पति वरिन कशी अधना' हे पद गाताना त्यातून धनयौवनाचा मद सूचित करणारा भामिनीचा तोरा 'साम्य तिळही नच दिसत मुखाचे' म्हणताना व्यक्त होणारा रेवतीचा लाडिकपणा 'मम मनी कृष्ण सखा रमला' म्हणणाऱ्या कृष्णचिंतनात विरलेल्या रूक्मिणीची तल्लीनता, 'माडीवर चल ग गडे' या आविर्भूत होणारी चारूदत्ताला पाहण्यासाठी उत्कंठित झालेल्या वसंतसेनेची अधीरता या साऱ्यांचे पु.लं.नी अतिशय तादात्म्याने वर्णन केले आहे.

निरनिराळया रसांचा आविर्भाव करणाऱ्या बालगंधर्वांच्या स्वरमाधुर्याची विशेषता वर्णन करून सांगताना त्यांनी अगदी मोजक्या शब्दांत आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. ते म्हणतात,

"... बालगंधर्वांच्या स्वरांच्या मूर्तीने आपला सोज्ज्वळपणा सोडला नाही. चिडलेल्या, रूसलेल्या, रागावलेल्या सारे विभ्रम शेवटी सौंदर्यच वाढवितात, तसे त्यांच्या स्वरांचे आणि बोलण्याचे आहे. 'सहज बोलणे तरी उपदेश' हे जसे संतांचे लक्षण तसेच कुठलाही स्वर लावला तरी तो सुंदर हे बालगंधर्वांचे स्वरलक्षण|"

काटेकोर शास्त्रशुद्ध गायकीपेक्षा तिच्यात गोडवा उत्पन्न करण्याकडे बालगंधर्व कसे कटाक्षाने लक्ष पुरवीत हा मुद्दा उपस्थित करून पु.लं.नी त्याचे केलेले समर्थन लक्षात ठेवण्यासारखे आहे.

'ते भीमपलासात शुद्ध निषाद लावून जातात. संगीत शास्त्रातील पीनल कोडाबर-हुकूम ह्या राज्यातल्या पोलिसांनी इतरांना ह्या गुन्ह्याबद्दल हातकडया घातल्या असत्या. पण अल्ला दियाखा साहेबांसारखा महर्षि त्याच स्वरावर जीव ओवाळीत असे. संगीतातल्या वैयाकरणी मंडळींना तर बालगंधर्वांनी आजन्म बुचकळयातच ठेवले...."

संगीत शास्त्राचे नियम लागू करताना काही तारतम्य बुद्धीही चालवायला हवी असे पु.लं.ना प्रामाणिकपणे वाटते. म्हणूनच वरील मुद्दयांच्या संदर्भात त्यांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे.

"....किंबहुना जगात काही गोष्टी चिकित्सेच्या पलीकडेच असतात त्यातल्याच बालगंधर्वांचा अभिनय आणि स्वर| शरदं पौर्णिचे चांदणे जसे चिकित्सेच्या पलीकडले, तसेच हे गाणे. त्या पौर्णिमेच्या चांदण्यांत देऊळ आणि बाजारपेठेचा रस्ता दोघांनाही मोहकता येते, तशी नारायणरावांच्या स्वरात न्हाऊन आलेली बाराखडीतली धोंडयासारखी कठोर अक्षरेदेखील खडीसाखरेसारखी गोड होऊन येते..."

उतारवयांतल्या बालगंधर्वांच्या भूमिका पाहून बरेच प्रेक्षक नाखुश होत. तारूण्याबरोबरच नारायणरावांचे देखणेपण ओसरले तसा त्यांचा अभिनयही गेला. आता त्या भूमिका करण्यात काही अर्थ उरला नाही असे ते उघड उघड टीका करू लागले. त्यांच्या या टीकेत केवळ उथळपणाच कसा भरला आहे खऱ्या रसिकतेचा कसा अभाव हे दाखवून देताना पु.ल. म्हणतात (11)

'वयाबरोबर बाह्य आकर्षणे नष्ट होत जातात शिथिल होतात. पण आतला गाभा मात्र अनाहत राहतो. आणि मूळचा पिंडच चैतन्यमय असेल तर तो अशावेळी बाहेरच्या जड शैथिल्याला आणि शारीरिक आधिव्याधींना फोडून बाहेर येतो. वेरूळच्या एखाद्या भग्न मूर्तीला देखील जे पाहणाऱ्याला भारावून टाकण्याचे सामर्थ्य आहे, ते त्या आतल्या तेजोमय पिंडाचे! चर्मचक्षुंना सहजी न दिसणारी ती अभिनयरेखांची मोहक आणि हलती आकृती ज्याला दिसते त्याला म्हातारपणात देखील बालगंधर्व दिसतो."

नारायणराव भजने गाऊ लागले या कारणानेही त्यांच्यावर काही मंडळी नाराज होऊ लागली. पण या नाराजीतही काही अर्थ नव्हता असे पु.लं.चे प्रांजळ मत आहे. या मुद्दयांचे विवेचन करताना ते म्हणतात –

'नारायणराव भजने गायला लागले म्हणून त्यांच्यावर जाणकारांचा राग आला होता. भजनांनी नारायणरावांचा गळा बिघडला अशी त्यांची तक्रार होती. नारायणरावांच्या गळयाची ओळखच पटली नाही या लोकांना! नारायणरावांचा स्वर हे निर्मळ पाणी आहे त्यात शब्दाचा जो रंग ते मिसळतील हे त्यांचे स्वरूप! 'नाही मी बोलत' म्हणताना त्याच स्वरांना शृंगार रूप येते. 'रामाच्या बागेमध्ये' सारखी जात्यावरची ओवी म्हणताना तिथे वात्सल्य दाटते आणि अभंग गाताना कंठी बसून साक्षात 'विठो' पालवीत आहे असे वाटू लागते. कारण त्या गळयाला तन्मयतेने सोडले नाही..."

बालगंधर्वांच्या लोकोत्तर अभिनयकलेचे अन् गायकीचे स्वरूप स्पष्ट करून सांगताना पु.लं.नी त्यांच्या काही मैफलींच्या अन् नाटकांतल्या भूमिकासंबंधीच्या आठवणी सांगितल्या आहेत. त्या सांगत असताना त्यांनी मधून मधून त्या कलावंताच्या स्वर माधुर्याला नि अभिनयाला अनुलक्षून ज्या उपमा दिल्या आहेत त्या लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. तसेच विवेचनाच्या ओघांत त्यांनी सुभाषितवजा वाक्यांची केलेली पेरणीही शैलीदार भाषेचा नमुना म्हणुन हृदयाच्या कप्प्यांत जतन करून ठेवण्या इतक्या मोलाची आहे. उदाहरणार्थ काही नमुने पाहा –(12)

'रंगभूमीवर येताना सारेच रंगून येतात. पण नारायणराव ज्या रंगात रंगले त्या रंगाने रंगण्याचे भाग्य जगाच्या रंगभूमीवर प्रवेश करण्यापूर्वी घेऊन यावे लागते."

माणसाची क्रूर चेष्टा करणे हा वार्धक्याचा धर्म आहे. पण गेली पन्नास साठ वर्षे अनेकांना ह्या राजहंसाने आपल्याजवळचा मोत्यांचा चारा खाऊ घातला आहे."

''संत, मोगरा फुलेला मोगरा फुलेला' म्हणून आनंदाने वेडावले. मराठी रंगभूमीवर त्यावेळी हा संगीताचा 'मोगरा फुललेला' होता."

''हा आतला पिंडच ज्या वेळी ओथंबलेला नसतो, आतल्या आत निखाऱ्यासारखा फुललेला नसतो त्यावेळी बाहेरचे देखणेपण मदतीला नाही येत! देखणी माणसे मराठी रंगभूमीवर काय कमी होवून गेली?..." पण बालगंधर्व म्हणजे बालगंधर्वच!

''काही काही स्वर तर बालगंधर्वांना आंदण मिळाले आहेत. शिवरायांच्या मागून लालमहाली फिरण्यांतले वैफल्य जसे मनाला हुरहूर लावते तसे बालगंधर्वांच्या भीमपलास बागेश्रीतला कोमल गंधार निषाद ऐकल्यावर बाकीच्यांचे गंधार निषाद उपरे वाटतात. ह्या स्वरात त्यांनी स्वरांचा मर्मबंध पकडला."

अशी किती म्हणून उदाहरणे द्यावी? रामूभय्या दाते ह्यांच्या रसील्या वृत्तीचा अन् हिराबाईच्या गायकीतल्या माधुर्याचा साक्षात्कार घडवितांनाही पु.लं.च्या रसक्तेला नि वाणीला असेच आनंदाचे उधाण आलेले असते जणू!

हिराबाईंच्या सुराला गाभाऱ्यातल्या नंदादीपाची किंवा याच लेखात त्यांनी केसरबाईच्या सुराला लखलखत्या झुंबराची दिलेली उपमा किती सार्थ आहे! कलावंताचे शरीर थकले. गात्रे काम देईनाशी झाली तरी त्यांच्यातला अस्सल कलावंताचा पिंड प्रकट झाल्यावाचून राहात नाही हे सांगतांना त्यांनी जीर्ण शीर्ण वाडयाच्या कलंदरपणाची कल्पना आणून देणाऱ्या फुटक्या बुरूजाची दिलेली उपमाही अशीच समर्पक नाही काय? 'उखडलेल्या महिरपीतली एखादी वेलबुट्टीही वाडयाचे अवघे वैभव बोलून जाते' हे याच संदर्भातले सुभाषितवजा वाक्यही पु.लं.च्या उपमा कौशल्याची यथार्थपणे जाणीव करून देते. 'दारीच्या तुळशीवरून आलेल्या झुळकीने तुळशीच्या मंजिऱ्यांतून निसटलेला सुगंध आणावा तसे घराबाहेरचे गाणे मोठया शालीनतेने स्वयंपाकघरात आले.' ही हिराबाईच्या खानदानी लोकाभिमुख गायकीला अनुलक्षून केलेली कल्पनाही किती सुंदर आहे! या कल्पनेचा त्यांनी अविष्कारही कसा डौलदारपणे केला आहे तो पाहा --

"हिराबाई म्हणजे गाण्याच्या अंगणातली तुळसच आहे. फुलल्यावर देखील मंजिऱ्यांचा सात्विक फुलोरा घेऊन फुलणारी सुगंधी, रंगदार फुलासारखी – डोळयावर आक्रमण करणारी नव्हे असल्याची वर्दी सुद्धा न देणारी?"

हिराबाईंनी तंबोऱ्याच्या जोडतारा जराशा जोरात झणकारल्यावर आणि त्यात आधीच सिद्ध असलेला आपला वरचा षड्ज मिसळल्यावर स्वरलुब्धांची जी काय अवस्था होते तिचे वर्णन करताना 'असंख्य प्राणांचे पक्षी उबदार घरटयांत विसावल्या सारखे विसावतात' ही पु.लं.ना सुचलेली कल्पना किती बहारीची आहे!

हिराबाईच्या कंठांतल्या माधुर्याचा अन् गायकीतल्या सौंदर्याचा प्रत्यय आणून देणाऱ्या अशा कितीतरी जागा या लेखातून दाखविता येतील. हिराबाईच्या स्वरसौंदर्याचा आस्वाद घेणारा हा लेख त्यातील मार्मिक विवेचन शैलीमुळे रसिकांच्या लक्षात राहीलच, शिवाय आणखी एका कारणाने त्यांना हा लेख महत्वाचा वाटल्यावाचून राहणार नाही. हिराबाईच्या कंठातला लवचिकपणा, त्यातील माधुर्य, संगीत साधनेसाठी त्यांनी घेतलेले परिश्रम, त्यांच्या स्वभावातील सौजन्य या गुणांचा परामर्श आतापर्यंतच्या त्यांच्या संबंधीच्या बहुतेक लेखात घेतला गेला आहे. पण पु.लं.नी हिराबाईच्या गायकीची वैशिष्टये विशद करून सांगताना ज्या एका मुद्दयाचा आवर्जून उल्लेख केला आहे त्यामुळे या लेखाला विशेष महत्व आले आहे असे मला वाटते.

ज्या काळात बायकांच्या गाण्याला जाणे अन् बायकांनी गाण्याच्या मैफलीला जाणे हे 'अब्रह्मण्यम्'च्या सदरात मोडत होते. गाणे बजावणे म्हणजे चंगी भंगीपणा असे समीकरण ज्या काळी समाजात रूढ होते त्याकाळी हिराबाईंनी मोठया धैर्याने पुढे येऊन भारतीय संगीत कलेवरचे हे लांच्छन पुसून काढले. हिराबाईच्या या असामान्य कामगिरीबद्दल लिहिताना पु.लं.नी म्हटले आहे (13)

"अफाट जनसंमर्दापुढे हिराबाई त्या रात्री गायल्या आणि भारतीय संगीतकलेची, या 'विराट घरी दासी' म्हणून राहिलेल्या सैरंध्रीसारखी अपमानास्पद अवस्था होती ती संपली. चटोर मैफलींच्या भांगेत तुळस फुलली."

संगीताच्या क्षेत्रात हिराबाईंनी घडवून आणलेल्या या क्रांतीकडे सामान्यतः कुणाचे लक्ष

जात नाही. पु.लं.नी अत्यंत कृतज्ञतेने हिराबाईंच्या श्रेयाचा वाटा त्यांच्या पदरांत टाकून एक मोठीच कामगिरी बजावली आहे यात शंका नाही.

''माणसं लेकी सुनांना घेऊन प्रथम बायकांच्या गाण्यांच्या मैफलींना गेली ती हिराबाईच्यामुळे. हिराबाईनी केलेली ही सामाजिक क्रांती फार मोलाची आहे. आज घरोघरीच्या पोरीबाळी मुक्त मनाने गाण शिकताना किंवा मैफलींतून गाताना दिसल्या की वाटत, ह्यांना सांगावे - 'ह्या तुमच्या भाग्याला हिराबाई कारण आहेत.' मोठी कांटेरी वाट होती ही हिराबाईंच्या सोज्वळ सुरांचे आणि त्याहूनही सोज्वळ वागण्याचे शिंपणे ह्या वाटेवर झाले आणि वाट मऊ झाली.''

लक्षात राहतील अशा आणखी कितीतरी गोष्टीचा उल्लेख या लेखात आहे. 'अखिल भारतीय कीर्तीची गायिका या बिरूदाबरोबरच आदर्श गृहिणी म्हणून त्यांनी मिळविलेला नावलौकिक, स्वतःची नाटक कंपनी कर्जबाजारी झाली तेव्हा काही हितचिंतकांनी त्यांना दिवाळ काढण्याचा सल्ला दिला असूनही त्यांनी तो नाकारून स्वतःच्या हिंमतीवर कर्जाची पै न पै फेडून प्रत्ययास आणून दिलेला बाणेदारपणा, मांडीवर नातवंड खेळायला लागली तरी या वयांतही मैफलीची दूरदूरची आमंत्रणे स्वीकारून प्रवासाला निघण्याइतकी त्यांच्या ठिकाणची निरलसता अशा अनेक गोष्टींमुळे लेखाची वाचनीयता वृद्धींगत झाली आहे. त्या सर्वांचाच इथे निर्देश करीन म्हटले तर लेखन विस्तार मर्यादेपलीकडे जाईल.

कलेच्या क्षेत्रात अमाप यश पदरात पडले असूनही हिंराबाईंना 'ग' ची बाधा झाली नाही. तसेच मत्सर कसा तो ठाऊक नसल्यामुळे त्या सदैव उदयोन्मुख कलाकाराचे कौतुकच करीत आल्या. त्यांना उत्तेजन देत आल्या. बरोबरीच्या कलाकारांनाही त्यांनी मनापासून दाद दिली. या बाबतीतल्या पु.लं.नी एक दोन आठवणी सांगितल्या त्या आमच्या असंख्य कलावंतांना उद्‌बोधक

वाटल्यावाचून राहणार नाहीत. हिराबाईंच्या गुणवर्णनाच्या संदर्भात पु.लं.नी आणखी मुद्दयाला स्पर्श केला तो मला विशेष महत्वाचा वाटतो.

गाताना बरेच कलाकार वेडीविद्री तोंड करतात, चमत्कारिक हावभाव करतात, सारं अंग घुसळून काढण्यापर्यंत त्यांची कधी कधी मजल जात असते. ही गोष्ट मैफलीच्या एकंदर प्रसन्न वातावरणाशी नि सौंदर्याशी विसंगत आहे हे पुष्कळांच्या ध्यानातही येत नाही. ह्या मुद्दयाचे विवेचन करताना ते म्हणतात – (14)

''गायकाचा स्वभाव त्याच्या गाण्यात दिसतो असे म्हणतात. इतरांचे मी सांगू शकत नाही. पण हिराबाईंचा स्वभाव आणि त्यांचे गाणे नव्हे त्यांचे दर्शन – ह्यांत अभेदच आहे. बाकी काही गवयांचे गाणेसुद्धा त्यांच्या स्वभावासारखे कजाग वाटते हे खोटे नाही. गायला बसतानाच मुळी मुर्गीची मुंडी मुरगळायला बसलेल्या खाटकासारखे बसतात। कुणी गळयापेक्षा डोळयांचे खेळ अधिक करतात, तर कुणाची तान समेवर येऊन पडण्याऐवजी तानच येऊन पडते. हिराबाईंनी आपल्या मैफिलीत असुंदर अशी एकही गोष्ट येऊ दिली नाही. थिल्लरपणाच्या वाऱ्याला त्या उभ्या राहिल्या नाहीत...''

'रामूभय्या दाते' ह्या लेखात पु.लं.च्या भाषाशैलीचा आणखी एक वेगळाच पैलू आपल्या दृष्टीस पडतो. मध्यभारतात बोलल्या जाणाऱ्या उर्दू-मिश्रित मराठीच्या ढंगाने पु.लं.नी रामू भय्यांच्या रसिकतेचे त्यांच्या शौकाचे नि खानदानी पद्धतीच्या विलासी राहणीचे वर्णन केले आहे. वर्ण्य विषयाशी अव्वलापासून अखेरपर्यंत सुसंवादितच राखणारा मध्यप्रदेशीय मराठीचा हा ढंग त्यातील आशयाइतकाच मनाला आल्हाद देऊन जातो. मद्याचे चषक भरून देणारा साकी त्या पेयासाठी चांदीचे भांडे न वापरता सुंदर काचेच्या प्याल्याचीच योजना करतो ती त्याला चांदी परवडत नाही म्हणून नव्हे तर त्या मादक पेयाच्या प्रकृतीशी कांचपात्राचा मुलायम नितळपणा सुसंगत दिसतो म्हणून.

उर्दू शब्दांचा सढळ वापर केल्याने या लेखाच्या भाषेलाही असेच एक अवीट सौंदर्य प्राप्त झाले आहे. "इंदूरच्या राजवटीचे बादशहा होळकर असले तरी सुरावटीचे राज्य दातेसाहेब चालवीत आले होते." कला ही कलावंतांहूनही कद्रदान आणि दीदावर यांच्यावर अवलंबून असते." 'जनात रघुपति राघव आणि मनात 'लखपती लाघव' कसे साधावे ह्याची चिंता करणाऱ्या वरिष्ठांशी

जमणारे सूत त्यांना काढता आले नाही'' अशी सुभाषितांसारखी वाक्यं तर ठायी ठायी विखुरली आहेत.

रामूभय्याचे व्यक्तिदर्शन घडवितांना लेखकाने मालवप्रांताच्या निसर्गसौंदर्याचे, बेगम अख्तरच्या घरी झालेल्या मैफलीचे अन् एका गरीब मुसलमान कुटुंबाने दिलेल्या खान्याचे असे काही रसभरीत चवीने वर्णन केले आहे.

'रावसाहेब' हे या संग्रहातील उत्कृष्ट व्यक्तिचित्र. कोणत्याही वाक्याची सुरूवात शिवीने करणाऱ्या रावसाहेबांच्या व्यक्तिमत्वातील परस्पर विरोधी प्रकारचे दर्शन घडविताना त्यांच्या ओबडधोबड व्यक्तिमत्वामागील माणुसकीचा, सौदार्हाचा नितळ झरा लेखकाने दाखविला असून रावसाहेबांचा रसिकपणा राग व प्रेम टोकाला जाऊन व्यक्त करणारी कृती, मनमोकळेपणा, भल्यांना लंगोटी व नाठाळांना काठी देणारा स्वभाव यांचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण केल्याने हे व्यक्तिचित्र वाचकांच्या मनात घर करते.

चिंतामणराव कोल्हटकर नि केशवराव भोळे ह्यांच्यातला कलावंत ज्या जिव्हाळयाने शब्दांकित केला तितक्याच तद्रूपतेने अप्पा, इंटर, नॅशनल दीक्षित यांच्यातला साधासुधा प्रापंचिक माणूस रेखाटला. अप्पा, बाय हे लेख इतर गुणांबरोबरच त्यातल्या मिष्किलपणामुळेही वाचकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहतील. 'दिनेश' या सव्वादोन वर्षाच्या बालकाचे चित्रण करताना बालकांच्या संदर्भातील लेखकाची सुक्ष्म निरीक्षण शक्ती दिसते. छोटया दिनेशच्या बाल्यसुलभ स्वभावातल्या गंमती जमती वर्णन करून सांगताना, ते लहानाहून लहान होतात. बालकांच्या निरागसतेचे त्यांच्या अवखळपणाचे पुं.ल. किती तादात्म्याने चित्रण करू शकतात.

शिवशाहीर 'बळवंत मोरेश्वर पुरंदरे' यांच्या चित्रणातून लेखकाला वर्ण्य व्यक्तीविषयी वाटणारे भाव प्रकट होतात. वाचकांना वेगळयाच भावविश्वात घेऊन जाणारा आणखी एक उत्कृष्ट लेख. बाबासाहेब पुरंदऱ्यांचे इतिहासाशी एकजीव झालेले व्यक्तिमत्व चित्रित करताना पु.ल. ज्या ऐतिहासिक वातावरणाचा आभास निर्माण करतात. इतिहासकालीन शब्दांचा नि कल्पनांचा वापर करून ज्या दृष्टीआडच्या सृष्टीचे चित्र आपल्या डोळयापुढे उभे करतात ते पाहात असताना त्यांच्या वाग्विलासाचे कौतुक करावे, त्यांच्या कल्पनेची तारीफ करावी, की इतिहास पुरूषापुढे माथा नमविणाऱ्या

त्यांच्यातल्या विनम्रतेवरून जीव कुर्बान करावा हे खरोखरच कळेनासे होते.

ऋग्वेदी आचार्य विनोबा भावे यांच्यावरील लेखांची पातळी वैचारिक नि भावनात्मक दृष्टया जशी उंचावली आहे तशी पुरंदऱ्यांवरील लेखानेही ती सीमा गाठली आहे असे म्हणता येईल.

असे आहे 'गणगोतचे' अंतरंग! काशीवरून परतणाऱ्या यात्रेकरूला लहानशा गडूंत गंगा भरून आणताना त्या विशाल जलौघाचे सौंदर्य अन् शीतलाई आपण आपल्याबरोबर नेत आहोत असा थोडाच दावा करायचा असतो ? गडूंतल्या चार थेंबाच्या पावित्र्यात त्याला आपल्या यात्रेचे साफल्य पदरी पडल्याचे समाधान लाभत नाही का? 'गणगोत' मधल्या वाङ्‌मयीन प्रवाहात यथेच्छ डुंबल्यावर त्यातला थोडासा ओलावा आपल्याबरोबर नेता आला तरी तेवढयाने पावन झाल्याचे समाधान अनुभवता येईल.

----------

## – संदर्भ टीपा –

1. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 4.

2. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 10.

3. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 95.

4. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 99

5. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 100

6. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 104

7. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 109

8. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 110

9. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 112

10. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 112

11. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 197.

12. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 200

13. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 81

14. 'गणगोत', पु.ल. देशपांडे, मौज प्रकाशन (1998), आठवी आवृत्ती, पृ. 82

----------